# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 16/01/2024 (मंगळवार) सकाळ

## अवैधरीत्या रेतीची साठवणुक करून विक्री करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध गुन्हा नोंद

## नागपूर ग्रामीण विशेष पथकाची कामगिरी

मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण श्री. हर्ष पोद्दार यांनी नागपूर जिल्हयात अवैध धंदयावर कारवाई करून अवैध धंदयाचे समुळ उच्चाटन करणेबाबत आदेश दिले आहेत त्यांचे मार्गदर्शनाखाली मा. पोलीस अधिक्षक यांचे विशेष पथक हे अवैध धंदयावर कारवाई करीत असतांना दिनांक १६/०१/२०२४ चे ०९.१५ वा. ते ११.१० वा. सुमारास गोपनीय सुत्रधारकांकडुन मिळालेल्या माहितीवरून पोस्टे मौदा येथील माथनी येथे नाकाबंदी करीत असता यातील आरोपीतांनी संगणमत करून, आरोपी मालकांचे सांगणेप्रमाणे स्वत:चे आर्थीक फायद्या करीता शासनाची दिशाभूल करून एका रॉयल्टीवर ३ वाहने १) १२ चक्का टिप्पर वाहन क्र. एम. एच. ४०/सि.टी. ७४७५, २) १० चक्का टिप्पर वाहन क्र. एम. एच. ४०/ए.टी. ७४७५, आणि ३) १० चक्का टिप्पर वाहन क्र. एम.एच. ४०/ सि.एम. ७४७५ असे ३ वेगवेगळे वाहनांची सिरीज वेगवेगळी मात्र नंबर सारखेच चालवुन, रेती नांदेड येथुन लोड करून मौदा येथील रूट नसतांना माथनी मौदा नागपुर येथे आरोपीने आपले घरासमोर अनाधिकृतपणे साठवणुक करून, ईतर साथीदारांचे मदतीने जेसिबी आणुन अवैध विक्री करीत असल्याचे आढळुन आलेले आहे. यातील आरोपी क्र. १) प्रकाश भय्याजी शिवणकर वय ३४ वर्ष, रा. वार्ड क्र. २ स्वराज्य नगर, मुंदढे लेआउट माथनी, तह. मौदा, जिल्हा नागपुर, चालक व मालक (१) एम. एच. ४० सि.टी. ७४७५ आणि २) एम. एच. ४० ए.टी. ७४७५ या दोन्ही वाहनाचा मालक तसेच एम. एच. ४० ए. टी. ७४७५ चा चालक), २) विशाल वसंता पुडके, वय २९ वर्ष (एम.एच. ४०/सि.टी. ७४७५ चा चालक), ३) विनोद जबदीश सैनी वय ३२ वर्ष, रा. हासपुर, पोस्ट श्रीमाधवपुर, तह. श्रीमाधवपुर, जिल्हा सिख्खर राजस्थान, ह.मु. सि/ओ लक्ष्मीकांत मोथरकर माथनी मौदा, जिल्हा. नागपुर यांचे घरी किरायाने, (एम.एच.–४०/सि.एच. ४७३८ चा मालक), ४) मिलींद कोकाटे, वय ३० वर्ष, रा. माथनी, तह. मौदा, जिल्हा नागपुर, (एम.एच. ४०/ सि. एच.–४७३८ चा ऑपरेटर) आरोपीतांविरूद्ध कलम ४२०, ३७९, १०९, ३४ भारतीय दंडविधान संहीता १८६०, सहकलम ४८(७), ४८(८) महाराष्ट्र जमीन महसुल अधिनियम १९६६, सहकलम ४, २१ खानी आणि खनीजे (विकास आणि नियमन) अधिनियम १९५७, सहकलम ३, ४ सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान प्रतीबंधक अधिनियम १९८४ प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला आहे. आरोपीतांकडुन १) एक पांढऱ्या निळया रंगाचे टाटा कंपनीचे १२ चक्का टिप्पर एम. एच. ४० सि.टी. ७४७५ किंमती ४५,००,०००/–रू., २) एक पांढऱ्या निळया रंगाचे टाटा कंपनीचे १२ चक्का टिप्पर एम. एच. ४० सि.टी. ७४७५ मध्ये ०४ ब्रास रेती प्रत्येकी ५०००/–रू. प्रमाणे किमती २०,०००/–रू., ३) एम. एच. ४० ए.टी. ७४७५ मध्ये ०५ ब्रास रेती किमती २५,०००/–रू. ४) एक पिवळया रंगाची जेसीबी वाहन क्र. एम.एच–४०/सि.एच–४७३८ किंमती ३०,००,०००/–रू. ५) विविध कंपनीचे मोबाईल व इतर साहित्य २५५१०००/–रू. असा एकुण १,००,९६,०००/–रूपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

सदरची कारवाई ही सदरची कारवाई ही मा. पोलीस अधीक्षक सा. नागपूर (ग्रामीण) श्री. हर्ष पोद्दार (भा.पो.से.) तसेच अप्पर पोलीस अधीक्षक डॉ. श्री. संदीप पखाले साहेब यांचे मार्गदर्शनात सहायक पोलीस निरीक्षक अमित पांडे, पोहवा ललीत उईके, पोना प्रणय बनाफर, कार्तिक पुरी, बालाजी बारगुले, शुभम मोरोकार विशेष पथक नागपूर ग्रामीण यांनी पार पाडली.










पोलीस माहिती कक्ष

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर